**गट "अ" व गट "ब" (राजपत्रित) अधिकारी यांनी MahaPAR प्रणालीमध्ये Login करण्यासाठी WEBVPN Verification करून घेणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय लेखा व कोषागारे**

तळ मजला, कस्तुरी इमारत, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई. ४०००२०
दूरध्वनी क्र.- ०२२-२२८८०१०६ ईमेल- aaomahapardat.mu-mh@mah.gov.in

---

**वाचा :** १. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्र.सीएफआर-१२२०/प्र.क्र.११९/ आस्थामं (१३), दि. २६.११.२०२४.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. सीएफआर-१२२४/प्र.क्र.१६४/ आस्थामं (१३), दि. २२.०१.२०२५.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. सीएफआर-१२२४/प्र.क्र.१६४/ आस्थामं (१३), दि. १९.०३.२०२५.

---

क्र.संलेको ०३.२०२६/क.ले.३/गोअक/महापार/170 दि. 02/04/2026

## परिपत्रक

महापार प्रणालीमध्ये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या "गट अ" व "गट ब" (राजपत्रित) संवर्गातील संचालक ते सहाय्यक लेखा अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्यात येतात.

उपरोक्त वाचा क्र. ३ येथील परिपत्रकामध्ये पुढीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत- "आस्थापना मंडळापुढे प्रस्ताव सादर करताना विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल हे महापार प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीनेच नोंदविलेले असणे आवश्यक आहे. ऑफलाईन पध्दतीने नोंदविलेले कार्यमूल्यमापन अहवाल आस्थापना मंडळाच्या बैठकीत विचारात घेतले जाणार नाहीत."

उपरोक्त वाचा क्र. १ अन्वये महापार हे संकेतस्थळ पूर्वी Internet वर उपलब्ध होते. तथापि, दि. ०१ ऑगस्ट २०२४ पासून सदर संकेतस्थळ NICNet किंवा State Wide Area Network (SWAN- DIT) वर उपलब्ध आहे. सदर सुविधा NIC यांनी केवळ WEBVPN (saccess.nic.in या वेबसाईट) द्वारे उपलब्ध करून दिली आहे.

WEBVPN मधून Login करताना महापार प्रणालीचा आयडी व पासवर्डचा वापर करावा. बहुतांश अधिकाऱ्यांचे WEBVPN Verification झाले नसल्याने WEBVPN मधून Login होत नाही. त्यामुळे, सदर अधिकारी महापार प्रणालीमध्ये असूनही त्यांना गोपनीय अहवाल महापार प्रणालीमध्ये भरता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या "गट अ" व "गट ब" (राजपत्रित) संवर्गातील संचालक ते सहाय्यक लेखा अधिकारी या संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, ज्या अधिकाऱ्यांचे WEBVPN Verification झालेले नाही त्यांनी खालील Excel sheet मध्ये माहिती भरून वैयक्तिक/कार्यालयाच्या शासकीय ईमेल (@nic.in/@gov.in) वरूनच support-mahapar@nic.in या ईमेलवर पाठवावी. Excel sheet पाठविताना क्र.१४ च्या शेरा (Remarks) या रकान्यामध्ये WEBVPN मधून Login करताना "Authentication failed" किंवा "Support MahaPAR icon not visible" किंवा "Mobile number incorrect" या ३ त्रुटींपैकी जी त्रुटी येत असेल ती नमूद करावी.

| Sr. No. | Officer Full Name | Email Address (official) | Mobile No | Designation | Department Name | Service |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | MH-DAT | |

| CITY | LOCATION / OFFICE | State | Websites (to be accessed) | Website URL | Website Access Port | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| | | | Not Applicable | Not Applicable | Not Applicable | |

WEBVPN Verification झाल्यानंतर parichay.nic.in या संकेतस्थळावर जाऊन Password reset करावा व तद्नंतर, www.saccess.nic.in या संकेतस्थळावरून महापार प्रणालीमध्ये Login करावे.

रश्मी नांदिवडेकर

**(रश्मी नांदिवडेकर)**
**सहसंचालक (प्रशासन)**
**संचालनालय, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालये.
२. सर्व कोषागार कार्यालये.
३. म.वि.ले.से. मधील सर्व अधिकारी.

D:\महापार परिपत्रके\२०२६\web vpn verification Mahakosh परिपत्रक.docx